मेहकर तालुक्यातील ३० रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास >>पान 2

राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी कारखाना चालू झाल्यापासून एक रुपयाही शेतकऱ्यांना दिला नाही >>पान 3

जलजीवन मिशनची कामे तत्काळ पूर्ण करा; अन्यथा कारवाईला समोर जा, पाणीपुरवठा मंत्री ॲक्शन मोडवर >>पान 4

**सुविचार**

संघर्ष ही यशाची पहिली पायरी आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 218 ■ शनिवार, दि. 22 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




चिंताजनक बातमी! प्रियांका चोप्रा 'या' गंभीर आजाराशी लढतेय

आतील पान

# राज्य शासनाचे सर्वोत्तम काम हीच मोठी आश्वासक बाब : मुख्यमंत्री फडणवीस

## पायाभूत सुविधा विकासासाठी बँकाकडून सर्वोत्तम सहकार्य

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :महाराष्ट्र प्रगतीशिल राज्य असून राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व बँकाचे सहकार्य नेहमीच मिळत आले आहे. राज्यातील रस्त्यांची गरज लक्षात घेवून रस्ते विकासासाठी नियोजन करण्यावर भर देण्यात येत आहे.समृध्दी महामार्गाच्या यशस्वी कामामुळे आज अनेक बँका राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना कर्ज देण्यासाठी पुढे येत आहेत.राज्य शासनाचे सर्वोत्तम काम हीच सर्वात मोठी आश्र्वासक बाब आहे.महाराष्ट्र शासन म्हणजेच बँकासाठी आश्वासक असून बँकाकडून राज्य शासनाला यापुढे असेच सर्वोत्तम सहकार्य मिळेल अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.**

विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता,मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे,सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर,प्रधानसचिव अश्र्विनी भिडे, सचिव रस्ते सदाशिव साळुंखे,महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पदावर ब्रिजेश दीक्षित, हुडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय कुलक्षेत्र, आय. आय. एफ. सी. एल. (इंडियन इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड) चे मुख्य प्रबंधक राजकुमार राल्हण,कॅनरा बँकेचे महाप्रबंधक अलोक कुमार अग्र वाल, पंजाब नॅशनल बँकेचे जनरल मॅनेजर एस राजगुरू, नको बँकेचे कार्यकारी संचालक नितीन बोडके, बँक ऑफ महाराष्ट्राचे जनरल मॅनेजर अमित कुमार शर्मा, नाफेड चे उपाध्यक्ष हर्षल महावरकर, पंजाब अँड सिंध बँकेचे मुख्य महाप्रबंधक विनोद कुमार



पांडे, एस. बी. आय. कॅपिटल लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष असित रंजन सिकंदर विविध बँकाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत सर्व बँकाच्या सहकार्याने राज्यात २५ कोटी ८७५ कोटींचे अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे अत्यंत चांगली बाब आहे.राज्यातील पायाभूत सुविधांसाठी या वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्यात १ लाख कोटी रूपयांची कामे पूर्ण होतील हे सांगताना मला आनंद होत आहे.रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करूनच राज्य विविध बँकाकडून नियमित कर्ज घेवून त्याची परतफेड करत असते. राज्यातील रस्ते चांगल्या दर्जाचे होण्यासाठी राज्य शासन कोणाच्याही शिफारशीशिवाय प्रत्यक्ष रस्त्यांची गरज कोणत्या भागात आहे हे लक्षात घेवून रस्ते विकासासाठी नियोजन करून उत्तम दर्जाचे रस्ते देण्यासाठी प्रयत्नशील आहे.सर्व बँकानी राज्यातील पायाभूत सुविधांसाठी राज्य शासन करत असलेले नियोजन व अंमलबजावणी याची माहिती जरूर घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

**राज्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणावर भर : शिवेंद्रराजे भोसले**

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले,महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत विविध रस्त्यांची कामे सुरू आहेत. सुधारित हॅम पहिल्या टप्प्यातील कामे प्रगतीपथावर आहेत.माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वकांक्षी शंभर दिवसाच्या कार्यक्रमामध्ये एमएसआयडीसी मार्फत ३४ जिल्ह्यात जवळजवळ ५९७० किमी लांबीचे रस्ते सुरू करण्याचे प्रस्तावित होते ते सर्व कामे झाली आहेत उद्यीष्टापेक्षा जास्त कामे सुरू केली असून केले असून ते लवकर पूर्ण करण्यात येतील असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित म्हणाले की.शंभर दिवसाच्या कार्यक्रमामध्ये पुणे ते शिरूर उडाणपूल काम,तळेगाव- चाकण –शिक्रापूर हायवे,हडपसर यवत हायवे या कामांना आवश्यक असलेली मंत्रीमडळाची मान्यता घेवून नॅशनल हायवेची कामे गतीने पूर्ण करण्यात येतील असे त्यांनी सांगितले.





# कंत्राटदारांच्या अंगलट

# 10 कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई..

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा : जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या दहा कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. प्रत्येक दिवसाला दंड आकारण्यात आला असून यामध्ये सर्वात जास्त दंड बालाजी बिल्डर्स या कंत्राटदाराला ठोठावण्यात आला आहे. यावरून बालाजी बिल्डर्सचे काम हे अत्यंत ढिसाळ असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जलजीवन मिशन अंतर्गत कामे करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. मात्र, सदर कामाचा कालावधी होऊनही कामे पूर्णत्वास न गेल्याने संबंधित विभागाने काम करणाऱ्या कंत्राटदराला प्रत्येक दिवसाला दंड ठोठावून दंडात्मक कारवाई केली आहे. यामध्ये ३० गाव पाणीपुरवठा काम करणाऱ्या अतुल इंजिनियर्स सर्विस या कंत्राटदाराला ४६११ रुपये प्रति दिवस तर, अंढेरा ९ गाव पाणीपुरवठा करणाऱ्या बालाजी बिल्डर्सला ११ हजार ६४१ रुपये प्रति दिवस, अंढेरा ९ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम करणाऱ्या बालाजी बिल्डर्स या कंत्राटदाराला ३९७६९ रुपये प्रति दिवस, डोंगर खंडाळा, खेर्डी गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या ओम बाहेकर अँड यू देशमुख या कंत्राटदराला २५८८ रुपये प्रति दिवस, घाटपुरी पाणीपुरवठा काम करणाऱ्या श्री ए.पी.सास्ते कंत्राटदाराला ५३५६ रुपये प्रति दिवस, घाटपुरी येथील जल जीवन मिशनचे काम करणाऱ्या ए.पी.सास्ते या कंत्राटदाराला २००९ रुपये प्रति दिवस, गिरवली ७ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम करणाऱ्या अतुल इंजिनिअर कंत्राटदराला १२४२० रुपये प्रति दिवस, हातेडी ५ गाव पाणीपुरवठा काम करणाऱ्या अतुल इंजिनिअर्स कंत्राटदाराला ७५२१ रुपये प्रति दिवस, जानेफळ, कळंबेश्र्वर पाणीपुरवठा योजनेचे काम करणाऱ्या ए. पी .सस्ते या कंत्राटदाराला २६५२ प्रति दिवस, लोणी काळे ७ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम करणाऱ्या बालाजी बिल्डर्सला कंत्राटदाराला १८४०४ रुपये प्रति दिवस, सुतळा खुर्द पाणीपुरवठा योजनेचे काम करणाऱ्या एल. जे. देशमुख आणि ए. बी.



इंगळे कंत्राटदाराला ३९५१ रुपये प्रति दिवस व येळेगाव २ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम करणाऱ्या ओम बाहेकर आणि बालाजी बिल्डर्स या कंत्राटदाराला २२८६६ रुपये प्रति दिवस अशी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे कंत्राटदाराचे पितळ उघडे पडले असून केवळ कंत्राट घ्यायचे आणि काम न करता जनतेला वेठीस धरायचा असा प्रकार मतदारसंघात सुरू आहे.या संदर्भात आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभेत प्रश्र्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले आहे.त्यामुळे हे प्रकरण आता वेगळ्या वळणावर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## बालाजी बिल्डर्स ला सर्वात जास्त दंड

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यात येत आहे त्याचबरोबर मेहकर तालुक्यात ९२ ठिकाणी जलजीवन मिशन योजनेचे काम करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे.या ९२ कामापैकी तब्बल २८ कामे हे बालाजी बिल्डर्स या कंत्राटदाराने घेतले असल्याची बाब समोर आली आहे. तब्बल ३० टक्के च्या वर कामे घेऊन एकही काम पूर्णत्वास न करण्यात आल्याने संबंधित विभागाच्या वतीने आता दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या दंडात्मक कारवाईमध्ये सर्वात जास्त दंड हा बालाजी बिल्डर्स या नावाने कंत्राट करणाऱ्या कंत्राटदराला ठोठावण्यात आला आहे.यावरून बालाजी बिल्डर्सचे काम हे अत्यंत ढिसाळ असल्याची बाब समोर आली आहे. तर, आमदार सिद्धार्थ खरात यांनीही विधानभवनात प्रश्र्न उपस्थित करून अधिकाऱ्यांनी एकाच कंत्राटदाराला तब्बल २८ कंत्राट कसे दिले असा प्रश्र्न केला आहे. याबाबत आता काय कारवाई केल्या जाते याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

## जागतिक जल दिन

आज २२ मार्च, आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाट्याने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

# मेहकर तालुक्यातील ३० रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

## तहसीलदार निलेश मडके यांचा पुढाकार : शासकीय कामात अडथळा एका शेतकऱ्यावर गुन्हा दाखल







**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री यांचा १०० दिवसाचा कृती आराखडा या अभियानांतर्गत मेहकर तालुक्यातील शेत रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. आतापर्यंत तालुक्यातील ३० रस्ते हे अतिक्रमण मुक्त करण्यात आले असून यामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. अशी माहिती मेहकरचे तहसीलदार निलेश मडके यांनी दिली. त्याचबरोबर तालुक्यातील वरुड कनका या गावातील एका शेतकऱ्याने शासकीय कामात अडथळा आणल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील हा पहिला गुन्हा असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री यांचा शंभर दिवसाचा सात कलमी कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत मेहकर तालुक्यातील विविध विभागांतर्गत नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविले जात आहे. त्याअंतर्गत मेहकर तालुक्यातील शेत रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी तहसीलदार निलेश मडके यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत तालुक्यातील वरुड कनका या गावातील क्षेत्र रस्ता मोकळा करण्यात आला आहे. मात्र तेथील एका शेतकऱ्याने शेत रस्ता मोकळा करण्यास मज्जाव केल्याने त्याच्यावर जिल्ह्यातील पहिला गुन्हा दाखल झाला आहे. त्या शेतकऱ्याला गावातील प्रतिष्ठित मंडळींनी तंटामुक्त अध्यक्ष, सरपंच यांनी वारंवार समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, शेतकरी समजावण्याच्या मनस्थितीत नसल्याने त्यांनी शासकीय कामात अडथळा केल्याने नाविलाजाने त्या शेतकऱ्याविरुद्ध तक्रार करून गुन्हा दाखल करावा लागला असल्याची माहिती तहसीलदार निलेश मडके यांनी दिली. तसेच मेहकर तालुक्यात आतापर्यंत ३० शेत रस्ते मोकळे करण्यात आले असून १५ एप्रिल पर्यंत २५ ते ३० रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात येतील अशी माहिती तहसीलदार निलेश मडके यांनी दिली. त्याचबरोबर या मोहिमेसाठी पोलीस प्रशासनाचे महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी यासाठी सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार निलेश मडके यांनी केले आहे.

### मुख्यमंत्र्यांचा सात कलमी महत्त्वाकांक्षी कार्यक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विभागांना शंभर दिवस सात कलमी कार्यक्रमाची आखणी करून अंमलबजावणी करावी असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार संपूर्ण महाराष्ट्र सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारी निवारण, कार्यालयीन सोयी सविधा, क्षेत्रीय कार्यालयाने भेटी, आदी कार्यक्रम १५ एप्रिल पर्यंत राबविण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्र्याच्या या महत्त्वाकांक्षी अभियाना अंतर्गत मेहकर तालुक्यात विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.या कार्यक्रमातून शेतकरी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या निकाली निघत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे..

# चिंताजनक बातमी! प्रियांका चोप्रा 'या' गंभीर आजाराशी लढतेय

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री प्रियांका चोप्रा सध्या एका गंभीर आरोग्य समस्येचा सामना करत आहे. तिने स्वतःच याचा खुलासा करत सांगितले की, नाकाच्या शस्त्रक्रियेत झालेल्या चुकीमुळे तिला दमा आणि नैराश्याचा सामना करावा लागत आहे. विशेषतः करोना काळानंतर तिच्या दम्याच्या त्रासात वाढ झाली असून, ती अजूनही या आजाराशी झुंज देत आहे.

नाकाच्या शस्त्रक्रियेमुळे आरोग्यावर परिणाम :

एका मुलाखतीत प्रियांकाने सांगितले की, नाकाच्या चुकीच्या शस्त्रक्रियेमुळे तिच्या श्र्वासोच्छवासाच्या समस्या वाढल्या आहेत. दमा आणि मानसिक आरोग्यावर याचा परिणाम झाला आहे. करोनानंतर तिला दम्याची जास्त भीती वाटू लागली आणि त्याचा थेट परिणाम तिच्या आरोग्यावर झाला.

उन्हाळ्यात दम्याची लक्षणे अधिक जाणवतात. उष्णतेमुळे श्र्वास घेताना अडथळा येतो, ज्यामुळे दम्याचे लक्षणे अधिक तीव्र होतात. प्रियांकाने सांगितले की, तिला या त्रासातून सावरायला खूप वेळ लागला, परंतु आजही ती या आजाराशी संघर्ष करत आहे.

दम्याची कारणे आणि त्याची लक्षणे :

प्रियांकाने स्पष्ट केले की, नाकाच्या शस्त्रक्रियेनंतर तिच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम झाला होता. चुकीच्या सर्जरीमुळे तिच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक प्रभाव पडला. दम्याच्या त्रासामुळे तिला श्र्वास घेण्यास अडचण जाणवते, त्यामुळे तिच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम झाला आहे.

दम्याचा त्रास हा श्वसननलिकेत सूज आल्यामुळे होतो. यामध्ये श्र्वास घेण्यास त्रास होतो, छातीत दुखते, सतत खोकला येतो आणि दम लागतो. हा आजार कोणत्याही वयोगटातील लोकांना होऊ शकतो. परंतु, योग्य वेळी उपचार न घेतल्यास हा त्रास अधिक गंभीर होऊ शकतो.

दम्याचा त्रास कमी करण्यासाठी उपाय :

- धूळ, प्रदूषण आणि ॲलर्जीक घटकांपासून दूर राहा.
- बाहेर जाताना नेहमी मास्कचा वापर करा.
- श्वासोच्छवासास अडथळा निर्माण करणाऱ्या वातावरणापासून स्वतःला वाचवा.
- डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित औषधोपचार घ्या.
- नियमित व्यायाम आणि योगसाधना केल्याने दम्याचा त्रास कमी होऊ शकतो.

# पुणे जळीतकांडात वेगळंच काळंबेर? कंपनीच्या मालकांनी दिली महत्त्वाची माहिती

**पिंपरी चिंचवड/प्रतिनिधी** : पुण्यातील हिंजवडी परिसरात बुधवारी एक मिनी बसला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. ही बस हिंजवडी परिसरातील एका आयटी कंपनीच्या कर्मचाऱ्यांना घेऊन जात होती. कंपनीपासून दोन मिनिटांच्या अंतरावर असताना या बसला भीषण आग लागली. या आगीत चार जणांचा अक्षरशः कोळसा झाला. गाडीत अचानक भडका उडाल्याने बसमधून प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वतःचा जीवही वाचवता आला नाही.या प्रकरणी आता पोलिसांनी चालकाला अटक केली आहे. ५४ वर्षीय चालक जनार्दन हंबर्डीकर यानेच ही आग लावल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. कंपनीने चालकाचा पगार थकवला होता. त्यामुळेच संतापून चालकाने हे कृत्य केल्याची माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे. मात्र या सगळ्या प्रकरणात वेगळंच काहीतरी काळंबेर असल्याची नवी माहिती समोर आली आहे. या सगळ्या घडामोडींवर व्युमा ग्राफिक्स कंपनीचे मालक नितेश शाह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कंपनीने चालकाचा कसलाही पगार थकवला नाही. त्याला वेळोवेळी पगार दिला होता. आरोपीकडे बेंझिंन केमीकल कुठून आलं? याची माहिती मला नाही, आम्ही पोलिसांना सहकार्य करत आहोत, अशी प्रतिक्रिया शाह यांनी दिली. आरोपी चालकाने पगार थकवल्याने हे कांड केलं नसेल, तर नेमकं कशामुळे हा गुन्हा घडवून आणला? याबाबत आता विविध तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

## दिल्लीत न्यायाधीशांच्या घरी आग विझवताना सापडली रोकड

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तींच्या घरात मोठ्या प्रमाणावर रोख पैसे मिळाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजिअमने या न्यायमूर्तींना अलाहाबादच्या हायकोर्टात बदली करण्याची शिफारस केली आहे. यशवंत वर्मा असे या न्यायमूर्तींचे नाव असून त्यांच्या सरकारी निवासस्थानाला आग लागली होती, ही आग विझवायला गेलेल्या अग्निशमन दलाला त्यांच्या घरात मोठ्या प्रमाणावर पैशांचा साठा सापडला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी आग लागली तेव्हा वर्मा हे दिल्लीत नव्हते. यावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांना आणि अग्निशमन दलाला बोलविले. ही आग विझवत असताना एका खोलीत अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर कॅश सापडली. पोलिसांनी याची माहिती ताबडतोब त्यांच्या वरिष्ठांना दिली. तिथून सर्वोच्च न्यायालयाला याची सूचना देण्यात आली. हायकोर्टाच्या जजच्या घरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम सापडल्याने न्यायपालिकेत खळबळ उडाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वात वर्मा यांची बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर काही न्यायमूर्तींनी त्यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली आहे. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्धचा अहवाल आल्यानंतर वर्मा यांची बदलीची शिफारस करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने गुरुवारी (दि. २०) तातडीची बैठक घेतली आणि त्यामध्ये बदलीची शिफारस करण्यात आली. अद्याप यावर कोणताही निर्णय झालेला नाही.

# श्री सारंगधर बालाजी व चालुक्यकालीन नरसिंह मंदिर तीर्थक्षेत्र कॅरीडोरचा विकास होणार

## आमदार सिद्धार्थ खरात यांची माहिती : मुख्यमंत्र्यांची भेट

**दैनिक आपला विदर्भ**





**मेहकर/प्रतिनिधी :** येथील यादवकालीन सर्वात उंच शारंगधर बालाजीची मूर्ती तसेच उत्तर चालुक्य कालीन जगातील सहावे नरसिंह देवस्थान ,श्रीरामाद्वारे स्थापित ओलांडेश्र्वर महादेव मंदिर, गायत्री माता मंदिर व संत बाळाभाऊ महाराज पितळे मठ यांचा एकत्रित तीर्थक्षेत्र - पर्यटन विकासाचा आराखडा तयार करण्याचे व त्यासाठी निधी देण्याबाबत आमदार सिद्धार्थ खरात यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. येथे येणाऱ्या भाविक ,संशोधक, पर्यटक आणि भक्तांसाठी किमान मूलभूत सोयी सुविधा मिळणेसाठी या परिसराला तीर्थक्षेत्राचा ब-वर्ग दर्जा देऊन १०० ते १५० दिडशे कोटी पर्यंतचा तिर्थक्षेत्र, पर्यटनाचा विकास आराखडा करण्याबाबत मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी मुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांना याबाबत मागणी केली असता मुख्यमंत्री यांनी या प्रस्तावावावर सकारात्मक भूमिका घेऊन आराखडा तयार करण्याच्या सूचना विभागाला दिल्या.या वेळी नरसिंह मंदिराचे विश्र्वस्त श्रीहरी पितळे यांनी मुख्यमंत्री यांना शाल देऊन नरसिंह देवस्थानाची सुंदर मूर्ती व नरसिंह देवस्थानाबद्दलची माहिती पुस्तिका दिली.तसेच मुख्यमंत्री यांना त कुलदैवत असलेल्या सहाव्या नरसिंह देवस्थानाला भेट देण्याबद्दल निमंत्रण दिले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी कारखाना चालू झाल्यापासून एक रुपयाही शेतकऱ्यांना दिला नाही

## माजी खासदार शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी पत्रकार परिषदेत यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** सध्या राज्यातील सर्व साखर कारखाने बंद झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने ऊस उत्पादकांना जी एफ आर पी दिली जाते.ती विना कपात आणि एक रकमे दिली पाहिजे आणि १९६६ च्या कायद्यानुसार ऊस तुटल्यानंतर १४ दिवसाच्या आत ती दिली पाहिजे, असा आदेश दिला आहे. २१ फेब्रुवारी २०२२ ला जो टप्प्याटप्प्याने एफ आर पी देण्याचा शासन निर्णय झाला होता, तो रद्दबादल ठरवण्यात आला आहे. असं असताना राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी साखर कारखाना चालू झाल्यापासून एक रुपयाही शेतकऱ्यांना दिलेला नाही. काही कारखान्यांनी पहिल्या पंधरवड्यातील किंवा महिन्यातील अर्धवट दिली आहे. अशी माहिती शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी बारामती येथे पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ते म्हणाले की, मागील वर्षाच्या रिकवरीच्या आधारे प्रत्येक कारखान्याची एफआरपी निश्चित करून जी रक्कम शिल्लक राहिले आहे. त्याला ऊस दर नियंत्रण अध्यादेश १९६६ चे कलम ३ ए प्रमाणे त्यांच्यावर कारवाई करावी. पंधरा टक्के व्याजाने शेतकऱ्यांचे पैसे अदा करण्याचा आदेश द्यावा, तो आदेश कारखान्यांनी मान्य केला नाही तर, त्यांच्यावर सरकारी थकबाकी समजून जप्तीची कारवाई करावी. साखर कारखान्याच्या मालमत्ता निलावाद काढून शेतकऱ्यांचे पैसे अदा करावेत ही मागणी मी करणार आहे. याबाबत मागणीचे पत्र साखर आयुक्तांना दिले आहे.कोणत्या कोणत्या कारखान्याची बाकी शिल्लक आहे. या संदर्भातील शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यासाठी आज मी फलटण पुणे या भागात आलो होतो. मराठवाड्यातील आणि सोलापुरातील माहितीही संकलित करून पुढील आठवडाभरात मी साखर व त्यांची भेट घेणार आहे. असे त्यांनी सांगितले तसेच नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना काहीही मिळालेले नाही, शेतकऱ्यांचा विश्वासघात झाला आहे.आमचे सरकार आले तर, शेतकऱ्याचा सातबारा कोरा करू अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केलेली होती आणि ते माहितीचे नेते होते. असे जाहीरनामे त्यांनी आश्र्वासन दिले होते पण ते आश्र्वासन त्यांनी बाजूला ठेवले. या बजेटमध्ये त्याची तरतूद व्हायला पाहिजे होती. मागील तीन वर्षापासून ठिबक सिंचनाच्या अनुदान शेतकऱ्यांना मिळालेले नाही. शेतकऱ्यांनी अशा पद्धतीच्या योजना जाहीर केल्या मात्र, त्याचे अनुदान शेतकऱ्यांना मिळालेला नाही.या बजेट मधून शेतकऱ्यांच्या हाताला काही लागलेले नाही. राज्य सरकारकडून विश्र्वासघातच झालेला आहे.

प्रत्येक पिकाला हमीभाव द्यायचा आणि हमीभावापेक्षा २० टक्के अनुदान जास्त द्यायचे आश्र्वासन याच महायुतीने निवडणुकीत दिले होते.प्रत्यक्षात मात्र केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के आयात शुल्क लावले. त्यामुळे कांद्याचे भाव गडगडले. तानझानियातून डाळ आयात केली. हरभरा आणि तुरीचे भाव गडगडले. खरेदी केंद्र सुरू नाहीत. पामतेल आयातीवरचं आयत शुल्क केंद्र सरकारने शून्य केले.त्यामुळे सोयाबीन ९००० वरून ३८०० पर्यंत येऊन ठेपली आहे आणि हमीभाव आहे ४८९२ म्हणजे हमीभावावर २० टक्के अनुदान बाजुला राहिले आणि हमीभाव सुद्धा मिळेल असा झाला आहे.हीच अवस्था कापसाची आहे. सरकारने एक रुपयांमध्ये पिक विमा देणार असल्याचा गाजावाजा केला, पण शेतकऱ्याच्या हातात ठेका



दिला. सरकारच्या हक्काची रक्कमच अजून विमा कंपन्यांना सरकारने भरलेली नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना विमाचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. खरिपाचा हंगाम संपून तीन महिने होत आले बीज कापणी सुरू झाली. तरी, देखील अजून खरीपाच्या विम्याचे पैसे मिळालेले नाहीत. गेल्या वर्षी ८००० कोटी रुपये शेतकऱ्यांना विमा संरक्षण रक्कम मिळाली होती. यावर्षी केवळ ६९३ कोटी रुपये मिळाले आहेत.आर्थिक कोंडी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. शक्तीपीठ महामार्ग हा भाविकांच्या साठी नाही हा विकासासाठी नाही तर राजकीय नेत्यांच्या विशेषता सरकारमध्ये असणाऱ्या राजकीय नेत्यांच्या आणि प्रशासनातल्या अधिकाऱ्यांच्या फायद्यासाठी आहे.

५० हजार कोटीचा यात घोटाळा होणार आहे. देशभरामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत जे रस्ते बांधले जात आहेत. पण आता तिथेही फार पारदर्शक आणि स्वच्छ कारभार होतोय असा दावा मी करत नाही, पण तरीसुद्धा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जे सहा पदरी रस्ते बांधले आहेत. त्याचा एक किलोमीटरचा खर्च साधारणपणे ३५ कोटी रुपये येतो. शक्तीपीठ महामार्गाचा विचार करायचा झाला तर ८०२ किलोमीटर लांबी आहे आणि खर्च आहे ८६ हजार ३०० कोटी. म्हणजे एका किलोमीटरचा खर्च आला १०७ कोटी ६० लाख रुपये म्हणजे तिप्पट खर्च येतो. जो रस्ता साधारणपणे तीस ते पस्तीस हजार कोटीत व्हायला पाहिजे तो ८६ हजार कोटी रुपयात होत आहे. त्या ठिकाणी ५० हजार कोटीचा मोठा घोटाळा होणार आहे. एक समृद्धी महामार्ग झाला आणि आमदाराचा दर ५० कोटी निघाला आता किती निघणार आहे मला माहित नाही. एवढा मोठा भ्रष्टाचार धर्माच्या नावाने देवाच्या नावाने करायचा उद्योग ही मंडळी करत आहेत.ज्या शेतकऱ्यांची जमीन जाणार आहे दुसऱ्या बाजूला ज्या शेतकऱ्यांची जमीन जाणार आहे त्याला मात्र जमिनीचा मोबदला कवडीमोल किमतीने दिला जात आहे. समृद्धी महामार्गाला किंवा अन्य राष्ट्रीय महामार्गाला ज्या शेतकऱ्यांचे रस्ते गेले त्यांना बाजार भावाच्या चौपट आणि पाचपट रक्कम दिली गेली. २०२२ साली जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा एक शासन निर्णय झाला समृद्धीला दिला जाणारा जो मोबदला आहे. त्याच्या ६० टक्के कपात करून केवळ ४० टक्के मोबदला देण्याची नवी दुरुस्ती केली गेली. त्यामुळे शेतकऱ्यांना कवडीमोल त्यांच्या जमिनीचे पैसे मिळणार आहेत. दुसऱ्या बाजूला राजकीय नेते मात्र, मालामाल होणार आहेत.शक्तीपीठ महामार्गामुळे सांगली कोल्हापूर आणि सातारा विशेषता कराड परिसर या तीन जिल्ह्यांना महापुराचा मोठा फटका बसणार आहे. कारण सांगली कोल्हापूर भागामधून जेव्हा हा शक्तिपीठ महामार्ग जातो तो सहा नद्यांवर मोठ्या पुलासाठी भराव भरावे लागणार आहेत आणि ते भराव महापुरास कारणीभूत ठरतील. जागतिक बँकेने सुद्धा महापुराचा अभ्यास करण्यासाठी मंडळ पाठवले ते तेव्हा महापुराला कारणीभूत करण्यासाठी पुलाचे भराव आहेत असा अहवाल दिलेला असताना ही नवीन पूल होत आहेत. हे सर्व कशासाठी तर काही लोकांच्या फायद्यासाठी, सध्या रत्नागिरी ते नागपूर जो राष्ट्रीय महामार्ग आहे तो नुकताच बांधून पूर्ण झाला आहे. त्याच्यावर अतिशय तुरळक अशी रहदारी आहे. त्या महामार्गावरून एका टोल वरून दररोज किमान ४० लाख रुपये पोलची वसुली झाली पाहिजे तरच तो फायद्यात राहतो पण जेमतेम दहा ते अकरा लाख रुपये एवढीच पोल वसुली होत आहे. म्हणजे सध्याचा प्रचलित महामार्ग तोट्यात असताना राज्य सरकारने त्याला समांतर दुसरा महामार्ग काढायची गरजच काय ? असा प्रश्न त्यांनी केला. अशी कुठल्या भक्ताने मागणी केली होती का? पंढरपूरला जाताना ट्रॅफिक जाम झाले का? तुळजापुरला जाताना किंवा औंढा नागनाथ ला जाताना की परळी वैजनाथ ला जाताना की नरसोबाच्या वाडीला जाताना ट्रॅफिक जाम झाले ? कुठे ट्रॅफिक जाम झाले होते? कुठे भाविकांची गैरसोय झाली होती ? कुठे आठ आठ तास लोक चिष्टत होते ? मग हा रस्ता कशासाठी आणि हे भाविक नेमकं गोव्याला कशासाठी जातात हे मला न सुटणार कोड आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## संक्षिप्त...


### नागपूर मध्ये झालेल्या महिला पोलीस दगडफेकी विरोधात सकल मराठा समाजाकडून तीव्र निषेध



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** १० मार्च २०२५ रोजी नागपूर येथे समाजकंटकांनी पोलिसांवर दगडफेक केली. तलवार व कुऱ्हाडीने हल्ला केला. यामध्ये अनेक पोलीस गंभीर जखमी झाले. यामध्ये महिला पोलिसांचा देखील समावेश आहे. याचबरोबर उपायुक्त स्तराचे वरिष्ठ पोलीस अधिकारी देखील गंभीर जखमी आहेत. या निंदनीय प्रकाराचा कोल्हापुरात सकल हिंदू समाजाकडून तीव्र निषेध करण्यात आला आहे. खाकी वर हात टाकणाऱ्या या समाजकंटकांवर कडक कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी करणारे निवेदन यावेळी सकल हिंदू समाजाच्या वतीने शाहूपुरी पोलीस ठाण्यात देण्यात आले आहे.

### जळगाव जिल्ह्यातील घरकुल, जल जीवन मिशन योजना आणि ग्रामीण भागातील स्वच्छतेला प्राधान्य, सीईओपदाचा पदभार स्वीकारताच मीनल करनवाल यांनी घेतली सर्व विभाग प्रमुखांची बैठक



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदाचा पदभार मीनल करनवाल यांनी स्वीकारला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी घरकुल योजना, जलजीवन मिशन आणि ग्रामीण स्वच्छता या तीन मुद्द्यांना प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले. जिल्हा परिषदच्या सर्व विभाग प्रमुखांशी संवाद साधून त्यांनी कामाच्या अंमलबजावणीबाबत सूचना दिल्या. ग्रामीण भागात स्वच्छता अभियान राबवून जिल्हा कचरा मुक्त करण्यावर भर देणार असल्याचेही त्यांनी सांगितले

### जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी यासह विविध मागण्यांसाठी शिक्षक व सेवक संघटनेच्या वतीने भव्य आक्रोश मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरात शिक्षण सेवक पद रद्द करावे, जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू व्हावी, यासह अनेक मागण्यांकरीता भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व सेवकांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनेच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला होता. कोल्हापुरातील टाऊन हॉल येथून सुरु झालेला हा मोर्चा शिक्षण उपसंचालक कार्यालयावर धडकला. या आक्रोश मोर्चात अनेक प्रलंबित मागण्यांची घोषणाबाजी करत शिक्षकांनी गजर केला. यावेळी वेगवेगळ्या मागण्यांचे फलकही हातात धरण्यात आले होते. तर या मोर्चामध्ये महिलांची संख्याही लक्षणीय होती. यावेळी शिक्षण उपसंचालक कार्यालयात लेखाधिकारी नंदकिशोर भंडारे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. दरम्यान मागण्या मान्य न झाल्यास राज्यस्तरावर मोठे आंदोलन छेडले जाईल असा इशारा महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश धनवडे यांनी दिला आहे.



## जागतिक वन दिनानिमित्त वने मंत्री गणेश नाईकांची मोठी घोषणा, वन खात्यात मिळणार हजारो नोकऱ्या

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील वाशी मध्ये आज जागतिक वन दीन साजरा करण्यात आला. यावेळी वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते वन खात्यात उत्कृष्ठ काम करणाऱ्या अनेक वन कर्मचाऱ्यांना पदके




देऊन गौरवण्यात आले. यावेळी बोलताना गणेश नाईक यांनी एक मोठी घोषणा केली असून, पुढील दोन महिन्यात वन खात्यात जी पदे रिक्त आहेत ती सर्व पदे भरण्यात येतील अशी घोषणा केल्याने, राज्यातील अनेक बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. यावेळी त्यांनी वन परिसर वाढवण्याचा निर्धार करून पुढील पाच वर्षात अशी कामे केली जातील की आपल्या खात्यावर कुणालाही टीका करण्याची गरजच भासणार नाही. यावेळी त्यांनी सर्व पदके विजेत्यांचे अभिनंदन करून वन कर्मचाऱ्यांना चांगले काम करण्याचा सल्लाही दिला. तर ज्यांना या खात्यात रस नसेल त्यांनी घरी बसावे असाही दम भरला.

### IPL आधीच BCCI चा मोठा निर्णय! चेंडूला लाळ किंवा थुंकी लावण्यावरील बंदी उठणार


**मुंबई/प्रतिनिधी :** भारताच्या टी२० लीग स्पर्धेला २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. २२ मार्चला कोलकाता आणि बंगळुरू या दोन संघांच्या सामन्याने स्पर्धेची सुरूवात होणार आहे. या स्पर्धेची सुरुवात होण्याआधी बीसीसीआयने एक महत्त्वाच्या नियमात बदल केला आहे. यंदाच्या हंगामापासून चेंडूची चकाकी कायम ठेवण्यासाठी चेंडूला लाळ किंवा थुंकी लावण्यावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## सध्याच्या पंचगंगा नदीस्त्रोत व मजरेवाडी उद्भव योजनांचे बळकटीकरण करण्याचे निर्देश

## इचलकरंजी शहर पाणीपुरवठ्यासाठी तिसऱ्या योजनेसाठी पर्यायांचा अभ्यास करावा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** इचलकरंजी शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी पंचगंगा नदी स्त्रोत, कृष्णानदीवरील मजरेवाडी उद्भव या अस्तित्वातील योजनांचे बळकीटकरण करावे. त्याबरोबरच तिसरी योजना तयार करण्यासाठी पर्यायांचा अभ्यास करावा. त्याचबरोबर पूरस्थितीतील पाणी साठवून त्याचा वापर करण्यासंदर्भातही विचार करून अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. इचलकरंजी शहराच्या पाणीपुरवठ्यासंदर्भात आज विधानभवनातील समिती कक्षात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगर



विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे आदी उपस्थित होते. इचलकरंजी शहराला सध्या पंचगगा नदी तसेच मजरेवाडी उद्भव योजनेतून ४५ दललि पाणी पुरवठा करण्यात येतो. शहराची वाढ तसेच भविष्यातील गरज लक्षात घेऊन पाणी पुरवठ्यासाठी तिसऱ्या योजनेची आवश्यकता आहे. त्यासाठी म्हैसाळ बंधारातून पाणीपुरवठा, दूधगंगा कॅनालमधून रेंदाळ येथील खाणीमध्ये पाणी साठवण करणे तसेच दूधगंगा कॅनॉलवरील पाझर तलावांचा स्त्रोत म्हणून उपयोग करणे या पर्यायांचा विचार करून अभ्यास अहवाल सादर करावा. त्याचबरोबर जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यात पुरामुळे वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी स्ट्रक्चर उभारण्याचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. इचलकरंजीसाठीही असा प्रकल्प उभारता येईल का याचाही विचार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. दूधगंगामधून कॅनॉलद्वारे येणारे पाणी बंद पाईपलाईनमधून आणता येईल का याचाही अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी इचलकरंजी शहराला म्हैसाळ बंधाऱ्यातून किंवा शिरटी योजनेतून शाश्र्वत व स्वच्छ पाणी पुरवठा करण्याची सूचना केली. यावेळी माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी सध्या अस्तित्वातील योजना सुरू ठेवून दूधगंगा कॅनालमधून येणारे पाणी रेंदाळ गावजवळील खाणींमध्ये साठवून वापर करता येईल, असे सांगितले. दूधगंगा कॅनॉलची दुरुस्ती व अस्तरीकरण करून तसेच कॅनॉल ऐवजी बंद पाईपलाईन करण्यासंबंधीचा पर्याय असल्याचे आमदार राहुल आवाडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी खासदार धैर्यशील माने दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठकीस सहभागी झाले होते. इचलकरंजी शहरातील भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन तसेच शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही, अशा योजना राबविण्यात यावेत, असे त्यांनी सांगितले. जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, प्रधान सचिव के. एच. गोविंदराज, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, इचलकरंजी महापालिका आयुक्त पल्लवी पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता वैशाली आवटी, अधीक्षक अभियंता प्रवीण पाटील यांच्यासह जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता आदी यावेळी उपस्थित होत.

# जलजीवन मिशनची कामे तत्काळ पूर्ण करा; अन्यथा कारवाईला समोर जा, पाणीपुरवठा मंत्री ॲक्शन मोडवर

## आमदार श्वेताताई महाले यांनी लावून धरला प्रश्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी : जलजीवन मिशनची अत्यंत संत गतीने सुरू असलेल्या कामाची गती वाढवा जलजीवन मिशनची कारणे कामे तत्काळ पूर्ण करा, अन्यथा कारवाईला सामोरे जा असा इशारा पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिला. चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई महाले यांनी जिल्ह्यातील जलजीवन विषयांची कामे तात्काळ पूर्ण करावी, दोषींवर कारवाई करावी, यासाठी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या धरणात अधिकाऱ्यांची बैठक लावली होती.यावेळी त्यांनी जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या कामासंदर्भात मंत्रिमहोदयासमोर वास्तव परिस्थिती व्यक्त करत अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाची पोलखोल केली. पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील व आमदार श्वेताताई महाले यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी जलजीवन मिशन संदर्भात ॲक्शन रोडवर भूमिका घेतल्याने जलजीवन विषयांची कामे या वर्षात तरी पूर्ण होतील, अशी अपेक्षा जनतेमध्ये निर्माण झाली आहे**





### जल जीवन मिशनची कामे पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्याची गरज

आमदार श्वेताताई महाले यांनी पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामाचा प्रश्न उपस्थित करून कामे तत्काळ पूर्ण करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे. या प्रकारामुळे गैरप्रकार करणाऱ्या अधिकारी कंत्राटदाराचे धाबे दणाणले आहेत. आमदार श्वेताताई महाले यांच्याप्रमाणेच जिल्ह्यातील इतर आमदारांनी सुद्धा सदर प्रश्न लावून धरून जिल्ह्यातील पाणीपुरवठा करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची योजना असलेल्या जल जीवन मिशन योजनेची कामे तात्काळ पूर्ण करून घेण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी जिल्ह्यातील सुज्ञ मतदारांकडून व्यक्त केली जात आहे.

चिखली मतदार संघाचे आमदार श्वेताताई महाले यांच्या मागणीनुसार व पुढाकाराने मुंबई येथे मंत्रालयात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कक्षामध्ये विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या जल जीवन मिशन व जीवन प्राधिकरण मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या आढाव्या संदर्भात आयोजित बैठकीस उपस्थित राहत कामनिहाय व गावनिहाय सर्व पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेतला.

यावेळी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी कामाच्या प्रगतीबाबत असमाधान व्यक्त करत सर्व प्रलंबित कामे तातडीने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने मार्गी लावण्याबाबत निर्देश दिले. तसेच कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या, टाळाटाळ करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करून संबंधितांना ब्लॅकलिस्ट करण्याचे आदेश देत महिन्याभराच्या आत कामकाजामध्ये सुधारणा न केल्यास व तातडीने कामे पूर्ण न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीला स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाचेप्रधान सचिव, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अभियान संचालक, जलजीवन मिशन अभियान संचालक, बुलढाणा जिल्हा परिषद स्वच्छ भारत मिशन मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्य अभियंता, अकोला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधीक्षक अभियंता, बुलढाणा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता राहुल जाधव, चिखली ग्रामीण पाणी पुरवठा योजना उपअभियंता अनिल चव्हाण, बुलढाणा ग्रामीण पाणीपुरवठा योजना उप अभियंता नितीन परळकर, शाखा अभियंता राजेंद्र वाघमारे, बुलढाणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यकारी अभियंता कृष्णा आव्हाड, बुलढाणा वरिष्ठ भूवैज्ञानिक व संबंधित सर्व अधिकारी उपस्थित होते.

## विविध वृत्त...


### सभागृहाची गरिमा धाब्यावर बसवत बोलणाऱ्या चित्रा वाघ - जयश्री शेळके

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** खोट बोल पण रेटून बोल ही भारतीय जनता पक्षाची पद्धत आहे. त्याच पद्धतीने चित्रा वाघ बोलल्या आहेत. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून संतोष देशमुख यांचा हत्याकांड, सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कस्टडीमध्ये झालेला मृत्यू असेल किंवा महिलांवरचे वाढते अत्याचार असतील, अनेक घटनांनी राज्य सरकारचे नाकर्तेपणा सिद्ध झालेला आहे. त्यातच अवघ्या अडीच महिन्यात यांना त्यांच्या एका मंत्र्याचा राजीनामा द्यावा लागला. आणि इतर काही मंत्री वाटेल तसं बोलून सरकारचे वाभाडे काढत आहे. राज्यकर्त्यांचा नाकारतेपणा आणि लपवण्यासाठी त्यावरून लक्ष विचलित करण्यासाठी अशा प्रकारे जे न्यायप्रविष्ट प्रकरण आहे दिशा सालीयन चे ते जाणीवपूर्वक ठरवून समोर आणल्या जाते आणि त्यावर ठरवून चर्चा घडवून आणली जाते. सभागृहाची गरिमा धाब्यावर बसवत बोलणाऱ्या चित्रा वाघ यांना एवढेच सांगायचं आहे की, सत्य परेशान होऊ शकता है लेकिन पराजित नही... बिन बुडाचे कोणी कितीही आरोप केले. तरीही सत्य लपणार नाही सगळा महाराष्ट्र आदित्य ठाकरेंच्या सोबत आहे.

### धरणातील पाणी सिंचनाशिवाय उद्योग आणि शहरांना दिल्यास यापुढे पाइपलाइन फोडून आंदोलन करू, शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांचा इशारा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** खडकपूर्णा धरणातून सिंचनासाठी पाणी मिळावं यासाठी बुलढाण्यातील राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त कैलास नागरे यांना आत्महत्या करावी लागते ही खेदाची बाब असून, यासंदर्भात आज शेतकरी नेते प्रकाश पोहरे आणि रविकांत तुपकर यांनी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत चर्चा केली. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी न देता शहर आणि उद्योगांना पाणी दिल्यास यापुढे पाईपलाईन फोडून आंदोलन करण्याचा इशारा प्रकाश पोहरे यांनी दिला आहे.

### शेगाव तालुक्यातील केसगळती प्रकार रेशनच्या गव्हामुळे नाहीत - राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत माहिती दिली

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात अचानक केसगळतीचे प्रकार दिसून आले आहेत. हे केसगळतीचे प्रकार रेशनच्या गव्हामुळे झालेले नाहीत. तसेच पाण्यामुळेही झाल्याचे दिसून येत नसल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी गुरुवारी विधानपरिषदेत माहिती दिली. अल्पकालीन चर्चेदरम्यान सदस्य सत्यजीत तांबे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री बोर्डीकर साकोरे बोलत होत्या. यावेळी चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, विक्रम काळे यांनी सहभाग घेतला.

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील केसगळतीचा प्रकार गंभीर असल्याचे सांगून राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या की, या केसगळतीचा प्रकार समोर आलेल्या प्रत्येक गावामध्ये घरोघरी सर्वेक्षण करण्यात आले आहे. या ठिकाणचे पाणी, माती, रक्ताचे नमुने तसेच गहू यांचे नमुने गोळा करण्यात आले. त्याच्या तपासणीसाठी आयसीएमआरकडे पाठवण्यात आले आहेत. आयसीएमआरचा अहवाल आल्यानंतर हे केसगळतीचे प्रकार कशामुळे घडत आहेत हे स्पष्ट होईल आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. तसेच या गावांमधील लहान मुले तसेच गर्भवती महिला यांचीही आरोग्याची तपासणी करण्यात आली आहे. तसेच राज्यात शासनामार्फत अनेक योजना राबवण्यात येत असतात. त्यामध्ये लाभार्थ्यांना धान्य वाटपापासून शिवभोजन, मध्यान्न भोजन अशा योजनांचा समावेश आहे. अशा थेट अन्न धान्य आणि खाद्यांनांशी संबंधित योजनांच्या वाटपामध्ये उत्कृष्ट दर्जाच्या अन्नधान्याचा आणि खाद्यांन्नांचे वाटप होते की नाही याची तपासणी करण्यात येते. या खाद्यांन्नांच्या तपासण्या आणखी कडक करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. आश्रमशाळा तसेच शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या मध्यान भोजनाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत. जर काही ठिकाणी यामध्ये हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई करण्यात येईल, असेही राज्यमंत्री बोर्डीकर साकोरे यांनी सभागृहात सांगितले.

# बुलढाण्यात विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा

- २३ मार्चला सहकार विद्या मंदीर येथे आयोजन
- ५० हून अधिक शासकीय विभागांचे स्टॉल्स

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील नागरिकांना कायदेशीर सेवा, शासकीय योजना व त्याच्या लाभाविषयी माहिती देण्यासाठी रविवार, दि. २३ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता सहकार विद्या मंदीर येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्यात ५० हून अधिक शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारले जाणार असून, नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती तसेच लाभ दिले जाणार आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य उपक्रम राबविण्यात येत आहे.

महामेळाव्याचा उद्घाटन समारंभ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल स. किलोर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष मंजुषा व. देशपांडे राहणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक विश्र्व प्र. पानसरे आणि जिल्हा परिषद बुलढाणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या महाशिबीरात विविध शासकीय योजना, कायदेशीर सेवा आणि नागरिकांसाठी उपयुक्त माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर तहसीलदाराकडून कारवाई

**तीन ब्रास रेतीसह वाहन पोलीस स्टेशनला जमा**



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव परिसरातील विठ्ठलवाडी जनुना परिसरात अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या टिप्पर वर महसूल विभागाच्या पथकाने कारवाई करून तीन ब्रास रेतीसह टिप्पर डोणगाव पोलीस स्टेशन मध्ये जमा केला आहे. ही कारवाई २१ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजताच्या दरम्यान विठ्ठलवाडी जनुना रोडवर करण्यात आली. या कारवाईमुळे मात्र, परिसरातील अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार विठ्ठलवाडी जनुना रोडवर अवैधरित्या रेती घेऊन टिप्पर जात असल्याची गोपनीय माहिती महसूल विभागाला मिळाली.

या माहितीवरून तहसीलदार निलेश मडके. शेलगाव येथील मंडळ अधिकारी, तलाठी यांनी विठ्ठल वाडी जनुना रोडवर एम.एच. २८ ए.बी. ७६४७ क्रमांकाचे टिप्पर वैधरित्या रेती घेऊन जात असताना दिसून आले. सदर टिप्परला थांबून त्याच्याकडे रेतीचा परवाना मागितला असता, सदर टिप्पर चालक शे.लतिफकडे रेती संदर्भात परवाना मिळाला नाही. त्यामुळे तहसीलदार निलेश मडके यांच्या मार्गदर्शनात शेलगाव व विठ्ठलवाडी येथील तलाठी यांनी सदर टिप्पर वर चालकावर कारवाई करून टिप्पर डोणगाव पोलीस स्टेशनला जमा केले. या घटनेमुळे मात्र परिसरात अवैधरित्या येती वाहतूक करणाऱ्यांचे दनानले आहे.

# मित्रांनीच केला अनिकेतचा खून पुर्व वैमनस्यातून हत्या केल्याची घटना २१ मार्च रोजी उघड

दैनिक आपला विदर्भ




**वाशिम/प्रतिनिधी :**तालुक्यातील बाभुळगाव येथील चौदा वर्षीय अनिकेतचा खुन हा त्याच्या मित्रांनीच पुर्व वैमनस्यातून केल्याची घटना २१ मार्च रोजी उघडकीस आली . या प्रकरणी गावातील दोन युवकांना अटक केली असून दोन्ही आरोपी हे मृतक अनिकेतचे जवळचे मित्र होते . अशी माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी आज २१ मार्च रोजी पत्रकार परिषदेत दिली . प्रणय पद्मणे आणि शुभम इंगळे असे अटक केलेल्या तरुणाची नावे आहेत.

पत्रकार परिषदेत माहिती देतांना पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी सांगितले की , अनसिंग पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असलेल्या बाभुळगाव येथील अनिकेत संतोष सादुडे ( वय १४) हा १३ मार्च अपहरण करण्यात आले अशी तक्रार अनसिंग पोलीस ठाण्यात दाखल केली होती.सदर तक्रारीवरून अनसिंग पोलीसांनी यासंदर्भात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला . दरम्यान , जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता १८ अधिकारी व अंमलदार यांची शोध पथके तयार करून चौफेर तपास सुरू केला. यामध्ये प्रणय पद्मणे यांनी शुभम इंगळे यांच्या मदतीने अनिकेतचा गळा दाबून खुन केल्याची कबुली दिली.विशेष म्हणजे आरोपींनी बाभुळगाव शेतशिवारातील एका खोलगट भागात अनिकेतचे प्रेत टाकुन त्यावर मोठमोठे गोटे (दगड ) ठेवलेले होते . सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधिक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती लता फड, सहायक पोलीस अधिक्षक नवदीप अग्रवाल, मंगरुळपीर उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती निलीमा आरज यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले, प्रदीप परदेसी, अमर चोरे, प्रविण धुमाळ, राजेश खेरडे, देवेंद्रसिंह ठाकूर, सुधाकार आडे, रामेश्र्वर चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद इंगळे, भारत लसंते, अमोल पुरी, राहुल शेजव, श्रीदेवी पाटील, योगेश धोत्रे, त्र्यंबक गायकवाड, संतोष आघाव, पोलीस उपनिरीक्षक राहुल चौधरी, निलेश जाधव, रामविजय राजपूत, ज्ञानेश्र्वर धावडे, प्रदीप घटे, स्वाती इथापे, राहुल गंधे, मारोती वंजारे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा, अनसिंग पोलीस स्टेशन, वाशीम शहर, वाशीम ग्रामीण, यवतमाळ, अमरावती व बुलढाणा सायबर टिम व अकोला स्थानिक गुन्हे शाखेची टीमचे अंमलदार यांनी केला आहे. पुढील तपास अनसिंग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमर चोरे करीत आहेत.